# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

लेखा व वित्त विभाग

Website – pcmcindia.gov.in E-mail – account@pcmcindia.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**अत्यंत महत्त्वाचे**

जा.क्र.लेखा/२९/कावि/७० /२५
दि. १४/०१/२०२५

## परिपत्रक


विषय : अर्थसंकल्पामधील महसुली / भांडवली लेखाशिर्षांच्या / कामांच्या तरतूदींच्या वाढ-घट प्रस्तावांबाबत.

आर्थिक वर्ष सुरू झाल्यानंतर मनपाच्या ब-याच विभागांकडून अर्थसंकल्पीय तरतूदींमध्ये वाढ-घट करणेबाबत प्रस्ताव लेखा विभागाकडे सादर केले जातात. त्यामुळे विभागांनी मनपाचे वार्षिक अर्थसंकल्प तयार करून सादर करताना आवश्यक ती खबरदारी न घेतल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच काही विभागांकडून एकाच नविन कामाची तरतूद पहिल्या कामाची निविदा कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर दुस-या नविन कामावर वर्ग करून त्या कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करून घेतल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे एका कामाच्या तरतूदीच्या रकमेवर दुप्पट अथवा दोनदा दायीत्व निर्माण झाल्याची प्रकरणे निदर्शनास आली आहेत. सदरची बाब ही आर्थिक औचित्य व आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने योग्य नसून मनपाच्या आर्थिक हितास बाधा पोहोचविणारी असून मनपाच्या दायीत्वामध्ये अनियमीत व अनियंत्रीत वाढ करणारी बाब आहे. त्यामुळे अर्थसंकल्पामधील नविन कामांच्या तरतूदींच्या वाढ-घट प्रस्तावांवर आर्थिक शिस्त व नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक असून त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहेत.


अर्थसंकल्पामधील नविन कामांच्या तरतूदींच्या वाढ-घट प्रस्तावांना आर्थिक शिस्त, आर्थिक औचित्य व नियंत्रण ठेवणेकामी लेखा संगणक प्रणालीमध्ये प्रयोजन करून देणेत आलेले असून आर्थिक दृष्टया आवश्यक ते निर्बंध घालणेत आलेले आहेत. यापुढे सर्व विभागांनी वाढ-घट प्रस्ताव लेखा संगणक प्रणालीमधील ''अर्थसंकल्पीय तरतूद वाढ-घट (Budget Re-appropriation) '' या मेन्यू मधून प्रस्तावित करावयाचे आहे. सदर कामकाज कार्यपध्दतीची पीपीटी PPT सोबत जोडणेत आलेली आहे. त्यानुसार सर्व विभागांनी अर्थसंकल्पीय तरतूदींचे वाढ-घट प्रस्ताव व विषयपत्र लेखा संगणक प्रणालीमधून प्रपत्र तयार करून विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीसह लेखा विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावयाचे आहेत. सदर परिपत्रकाची सर्व विभागप्रमुखांनी नोंद घ्यावी व सर्व संबंधित कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देणेत यावे.

( शेखर सिंह )
**आयुक्त तथा प्रशासक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी

प्रति:- सर्व संबंधीत विभाग/ विभागप्रमुख




वाढ / घटीचे ऑनलाईन प्रपत्र तयार करणेसाठी Budget Reappropriation क्लिक करावे




ज्या विभागासाठी वाढ / घटीचा प्रस्ताव तयार करावयाचा आहे तो विभाग निवडणे

Templet Download करणे (Excel file)

डाउनलोड केलेल्या excel Templet मध्ये फाईलचा फॉरमॅट बदल न करता अ.क्र., बजेटकोड, वाढ रक्कम व घट रक्कम टाकुन फाईल सेव्ह करणे, सेव्ह केलेली Excel फाईल सिलेक्ट करुन अपलोड करणे. सर्व माहिती तपासुन सेव्ह बटन क्लिक करुन प्रस्ताव सेव्ह करणे.

**Financial Accounting**

User :- सचिन चंद्रकांत राणे    FUND :- Main[2024-2025]

Sign Out

Master | Transaction | Bill Work Flow | Reconcilation | Reports | Cheque Work Flow | TDS | Setup | Menu Entry | Create Bill | TDS(NEW) | Accounting Reports | E-Budget | FD | Budget Ghoshwara | Budget Print

## Vad Ghat

Department Civil-HO-HO

Import File : Choose File N Upload    **Download Template**

| Sr no. | Budget Code: | Department | Workkey | Workname | Budget Head Name | New/Old | Original | Sudharit | Expence | Vad Amount | Ghat Amount | Balance |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 242500215 | Electrical-HO-HO | | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विविध इमारतीमधील वातानुकूलन यंत्रणेचे वार्षिक देखभाल दुरुस्त करणे.. (२०२४-२५) | MINOR REPAIRS AND MAINTAINANCE PART -1 | New | 8,00,000 | 8,00,000 | | 1,000 | 0 | 8,01,000 |
| 2 | 242500154 | Electrical-A WARD-A WARD | | अ प्रभागातील प्र.क्र.१० व ११ मुख्य चौकातील हायमास्ट दिव्यांची वार्षीक पद्धतीने देखभाल दुरुस्ती करणे व अनुषंगीक कामे करणे.(सन २०२४-२५) | MINOR REPAIRS AND MAINTAINANCE | New | 5,00,000 | 5,00,000 | | 0 | 1000 | 4,99,000 |
| 3 | | | | | | | | | | 0 | 0 | |
| | | | | | | | | | | 1,000 | 1,000 | |

Add More

Save Reset

Templet Download न करता प्रस्ताव तयार करावयाचा असल्यास Add More बटन क्लिक करुन बजेट कोड, वाढ रक्कम व घट रक्कम टाकुन सर्व माहिती तपासुन सेव्ह बटन क्लिक करुन प्रस्ताव सेव्ह करणे.

## PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION,PIMPRI PUNE 18

## Budget Reappropriation

**Department - Civil-HO-HO Vad Ghat No -44**

Send To Account

| Sr no. | Budget Code: | Department | Workkey | Workname | Budget Head Name | Original | Sudharit | Balance | Vad Amount | Ghat Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 222300178 | Civil-HO-HO | | प्रभाग क्र.७ भोसरी चांदणी चौक ते तांडेवाडी महाराष्ट्र बँक पर्यंतचा रस्ता अद्यावत पध्दतीने विकसित करणे. | VISION 2025 | 5,00,33,000 | 5,00,33,000 | 1,12,39,241 | 1,000 | 0 |
| 2 | 222300178 | Civil-HO-HO | | प्रभाग क्र.७ भोसरी चांदणी चौक ते तांडेवाडी महाराष्ट्र बँक पर्यंतचा रस्ता अद्यावत पध्दतीने विकसित करणे. | VISION 2025 | 5,00,33,000 | 5,00,33,000 | 1,12,37,241 | 0 | 1,000 |
| | | | | | | | | | 1,000 | 1,000 |


सेव्ह बटन क्लिक केल्यावर वाढ /घटीचे प्रपत्र प्रस्तावासह लेखा विभागकडे हार्ड कॉपी मध्ये पाठविणेसाठी सदर प्रस्तावाची प्रिंट काढणेत यावी.

प्रपत्रचा क्रमांक वाढ /घटीचे प्रस्तावा मध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

सदरचे प्रपत्र लेखा विभागकडे ऑनलाईन पद्धतीने पाठविणे आवश्यक आहे त्या कामी Send to Account क्लिक करावे.

प्रपत्र लेखा विभागकडे ऑनलाईन पद्धतीने सादर केल्यावर त्या मध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत.

मा. स्थायी समिती / मा. महापालिका सभा ठराव क्रमांक लेखा विभागाकडे प्राप्त झाल्यावर लेखा विभागामार्फत सदर प्रपत्रातील वाढ / घट ऑनलाईन पद्धतीने अंतिम करणेत येईल.




वाढ / घटीचे ऑनलाईन ट्रॅक करणेसाठी Tracking Budget Reappropriation क्लिक करावे